नि. फौजदारी खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : रोशन सुभाष गौर,

वय : २४ वर्षे,

धंदा : मासे विक्रेता,

राहणार : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी आरोपी निखील कहार व हर्ष कहार यांना ओळखतो. मी त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. दोन्ही आरोपी आजरोजी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहेत. फिर्यादी काजल ही माझी बहिण आहे. घटना दि. २९/०७/२०२३ रोजी टाकपुरा भागात, हनुमान मंदिराजवळ रात्री ११:०० ते ११:१५ वाजेदरम्यान घडली. घटनेवेळी आम्ही बाजारातुन घरी आलो व माझी आई, बहिणी काजल व वैष्णवी ह्या जेवण आटोपुन शतपावली करायला निघाल्या होत्या. आम्हाला फिर्यादीचा आरडा—ओरड ऐकु आला. त्यामुळे मी व माझे वडिल पाहण्यासाठी त्याठिकाणी गेलो असता, आरोपी क्र. २ हर्ष याने माझे वडिलांना डोक्यावर लोखंडी रॉड मारला. त्यामुळे माझे वडिलांना डोक्याला जबर दुखापत झाली व जखमेतुन रक्त निघत होते. वडिलांना आम्ही सरकारी दवाखान्यात नेले. पोलीसांनी मला घ टनेबाबत विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. ज्या रॉडने माझे वडिलांना मारहाण झाली तो मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला मुद्देमाल वस्तु क्र. 'अ' वरील लोखंडी रॉड दाखवला. याच रॉडने माझे वडिलांना मारहाण झाली होती. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.**

२. घटनेनंतर दोन—तीन दिवसांनी माझे बयान नोंदवण्यात आले होते. पोलीसांनी माझे बयान पोलीस ठाण्यात नोंदवले होते. फिर्यादीचे आरोपी क्र. १ सोबत सुमार ६—७ वर्षापुर्वी लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व फिर्यादी यांचे आपसांत पटत नाही, त्यामुळे फिर्यादी गेल्या एक—दिड वर्षापासुन माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी आरोपी क्र. १ सोबत राहण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही फिर्यादीची आरोपी क्र. १ पासुन फारकत घेण्याचे ठरवले आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, लग्नावेळी आरोपी क १ हा आमचे भागात राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनेवेळी आरोपी क्र. १ कडे मालवाहु बोलेरो पिकअप गाडी होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हा त्याची पिकअप गाडी उभी करून जात असतांना माझी आई व फिर्यादी यांनी त्याला फिर्यादीला फारकत दे असे म्हटले व त्याच्यासोबत बाचाबाची केली. आमचे घर व घटनास्थळ या दरम्यान ८ ते १० घरांचे अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे वडिलांनी आरोपी क्र. १ च्या गाडीला दगडं मारून काचा फोडल्या व त्याचे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने त्याबाबत आमचे विरूध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल आरोपीच्या गाडीची तोड—फोड करतांना त्या गाडीच्या लोखंडी बंफरवर पडले व त्यामुळे त्यांना डोक्याला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आपल्याविरूध्द केस करू नये म्हणुन आम्ही सर्वांनी ठरवुन आरोपीविरूध्द प्रस्तुत खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ याने माझे वडिलांना रॉड मारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद केल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडिल व फिर्यादी यांचे सांगण्यावरून आरोपींविरूध्द खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. २९.१०.२०२५
अकोट